**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.४२५ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. रमेश लक्ष्मण लोखंडे,
जुन्या ग्रामपंचायत मागे,
लोखंडे लेआऊट, प्रभाग-३,
मु.पो. उमरी, प्र.बा.ता.जि. अकोला.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
अकोला, ता.जि.अकोला.

२. जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत, उमरी,
प्र.बाळापुर, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक २३/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. रमेश लक्ष्मण लोखंडे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे अधिक्षक, पंचायत समिती, अकोला श्रीमती विद्या गिरी हया हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, उमरी श्री.जी.एस.निमकर्दे हे हजर आहेत.

दिनांक २७/१२/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता अर्जदार यांनी गटविकास अधिकारी यांचेसमोर हजर राहतील तसेच सचिव सुध्दा हजर राहतील व सदर प्रकरणात आदेशीत केल्याप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांचे समक्ष अर्जदाराला माहिती पुरविण्यात येवुन तसेच दिनांक २१/०२/०९ च्या प्रकल्प संचालक यांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या पत्रानुसार चौकशी झाली असल्यास त्याबाबत अर्जदाराला संबंधित चौकशी अपेक्षित असल्यास किती दिवसात पुर्ण होईल या बाबत अर्जदाराला कळवावे तसेच पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यासंबधाने ग्रामपंचायत उमरी चे दिनांक ०१/०५/०९ चे ग्रामसभेतील ठरावाची प्रत तसेच मुद्दा क्र.२ व ३ बाबतची माहिती गटविकास अधिकारी हे तपासुन अर्जदाराला त्यांचे समक्ष हस्तांतरित करतील व योग्य तो निर्णय प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेवुन केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल या आयोगास सादर करावा. अर्जदाराला दिनांक २७/१२/२०१० रोजी माहिती न मिळाल्यास अर्जदार लेखी तक्रार हया आयोगासमोर करु शकतील.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.४२७/ २०१०**
**अपिल क्र.४२८/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. सतिष गणपतराव चौके,
रा.रेणुका नगर, डाबकी रोड,
अकोला, जि.अकोला.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद,
अकोला, जि.अकोला.
२.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
समाजकल्याण अधिकारी गट 'अ'
जिल्हा परिषद, अकोला.
३.जन माहिती अधिकारी तथा
पशुधन विकास अधिकारी (तांत्रिक-१),
जिल्हा परिषद, अकोला, जि.अकोला.
४.जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी, समाजकल्याण विभाग,
जिल्हा परिषद, अकोला

**(आदेश पारीत दिनांक २३/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. सतिष गणपतराव चौके हे हजर आहेत. अपील क्रमांक ४२७/२०१० मध्ये प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा पशुधन विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला श्री.पि.के. वानखडे हे हजर आहेत. तसेच अपिल क्रमांक ४२८/२०१० मध्ये प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, अकोला, श्री.सी.बी. वंजारे हे हजर आहेत.

सदर दोन्ही प्रकरणात अर्जदाराने मागितलेली माहिती कलम ४ नुसार जी माहिती प्रकाशित करावयाची आहे ती समाजकल्याण व पशुसंवर्धन या दोन्ही विभागानी माहिती प्रकाशीत केल्याचे सांगितले. तरी, त्याबाबत दिनांक २७/१२/२०१० रोजी अर्जदार संबंधित कार्यालयात हजर राहतील व त्यावेळेला दोन्ही विभागाची जी माहीती प्रकाशित केली त्या प्रकाशित माहितीच्या झेरॉक्स प्रती काढुन उत्तरवादी यांनी त्याची एक प्रत अर्जदाराला व एक प्रत या आयोगाकडे पाठविण्यात यावी.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.४२९ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. सतिष गणपतराव चौके,
रा.रेणुका नगर, डाबकी रोड,
अकोला, जि.अकोला.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
अकोला, जि.अकोला.
२. जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत, कापशी (रोडे),
ता.जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक २३/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. सतिष गणपतराव चौके हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे अधिक्षक, पंचायत समिती, अकोला श्रीमती विद्या गिरी हया हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, कापशी (रोडे) श्रीमती एम.एस. डोंगरे हया हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराला २००५ पुर्वीचे अंकेक्षण अहवाल मिळाला आहे. सन २००५-२००६ चे अंकेक्षण झालेले असुनही त्याचा अहवाल संबंधित ऑडीटर कडुन अप्राप्त आहे. तरी. ग्रामपंचायत कडुन ऑडीटर यांना पत्र देवुन प्राप्त झालेली माहिती अर्जदाराला विनाशुल्क पुरवितील. तसेच संबंधित ऑडीटर यांनी हा आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसाच्या आंत संबंधित ग्रामपंचायतला अंकेक्षणाचा अहवाल पाठवावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

प्रत, माहिती व पुढिल कार्यवाही करिता अग्रेषित.
स्थानीक निधी लेखा परिक्षक, जठारपेठ, अकोला.

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.४३० / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. समीर अशोक पद्‍मावार
रा.पो.देऊरवाडा (पुनर्वसन), ता.दिग्रस,
जि.यवतमाळ.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
यवतमाळ, जि.यवतमाळ.

२. जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
यवतमाळ, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक २३/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तर्फे विस्तार अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद, यवतमाळ श्री.डि.जे. रामटेके हे हजर आहेत.

श्री.डि.जे. रामटेके, विस्तार अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक) यांनी अर्जदाराला दिनांक २१/१२/२०१० ला पंजीबध्द डाकव्दारे (अंडर सर्टिफिकेट पोष्टींग) माहिती पाठविल्याचे सांगितले आहे व तसा लेखी अभिप्राय दाखल केलेला आहे. अर्जदाराला सदरची माहिती मिळाली नाहीतर कलम १८ खाली या आयोगाकडे तक्रार करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.४३२/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. दिगांबर हरिभाऊ पजगाडे,
श्रीराव यांचे घरी, जामणकर नगर,
उमरसरा, ता.जि. यवतमाळ.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,
यवतमाळ, जि.यवतमाळ.

२. जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी, कुटूंब कल्याण पथक,
यवतमाळ, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक २३/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. दिगांबर हरिभाऊ पजगाडे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ श्री.डि.एन. देडे हे हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला हया आयोगासमोर माहिती पुरविली आहे. ती माहिती अर्जदार तपासुन पाहतील व त्यानंतर अर्जदाराला माहिती मिळाली की, नाही तसेच मिळालेली माहिती अपुर्ण मिळाल्यास दिनांक ०३/०१/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता अर्जदार लेखी तक्रार अपिलीय अधिकारी यांचेकडे करतील व त्यानंतर दुस-या तारखेला अर्जदार व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकुन उपलब्ध असलेली माहिती अर्जदाराला पुरवितील व त्यानंतर ८ दिवसात प्रथम अपिलात आदेश पारित करतील व त्या आदेशाची प्रत अर्जदाराला पाठवतील. तसेच अर्जदार यांनी प्रपत्र ‘अ’ नुसार दिनांक १८/१२/२००९ रोजी मागितलेली माहिती उशिरा दिली त्याबद्दल अपिलीय अधिकारी यांनी जबाबदार कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करावी व त्यानंतर व्दितीय अपिलात शास्ती लावण्यात येईल. प्रथम अपिलात ०३/०१/२०११ रोजी सुनावणी ठेवुन त्यानंतर १५ दिवसाचे आंत आदेश पारित करावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.४३३/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.डॉ.नामदेव नारायण गाठे,
कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी,
मु.भौरद, पो.मेडशी, ता.मालेगांव,
जि.वाशिम.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग),
जिल्हा परिषद, यवतमाळ.

२. जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक (सामान्य प्रशासन विभाग),
जिल्हा परिषद, यवतमाळ,

**(आदेश पारीत दिनांक २३/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.डॉ.नामदेव नारायण गाठे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ श्री.डि.एन. देडे हे हजर आहेत. उपमुख्य कार्यकारी अधिकारी तर्फे कक्ष अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, यवतमाळ हे हजर आहेत.

अर्जदार हे दिनांक २५/०७/९५ ते ऑगष्ट २००२ पर्यंत जिल्हा परिषद, यवतमाळ येथे वैद्यकिय सेवेत कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी म्हणुन कार्यरत होते. त्यानंतर अर्जदार हे गैरहजर होते. अर्जदाराने त्यानंतर साडेचार वर्षाने नियुक्त करुन घेण्याबाबत अर्ज केले व त्याबाबत काही उत्तर अर्जदाराला दिले नाही. तरी, अर्जदार हे सर्व अर्जाच्या प्रती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.रजकुंडवार यांना हस्तांतरित करुन त्यांची पोच घेतील व जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ हे अर्जदाराने दिलेल्या सर्व अर्जाच्या प्रती मिळाल्यानंतर ४ आठवडयात निर्णय घेतील व त्यांना आवश्यक वाटल्यास अर्जदाराचे लेखी व तोंडी म्हणणे ऐकुन घेतील. तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी घेण्यात आलेला निर्णय अर्जदाराला व्यक्तीशः किंवा पंजीबध्द डाकेने कळवावा व त्याच्या अहवालासह आदेशाची एक प्रत या आयोगास सादर करावी. त्यानंतर अर्जदाराला काही तक्रार करावयाची असल्यास योग्य त्या न्यायालयाकडे अर्जदार दाद मागु शकतात. वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**